CD/IWY/2808

**विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक,**

**आढावा बैठक - दिनांक 05/01/2021 रोजी सायं.04.00 वा - इतिवृत्त.**

---

मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक 03/01/2021 रोजी बैठकीत उपस्थित झालेल्या मुद्यांच्या अनुषंगाने विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेणेकामी समिती कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक येथे दिनांक 05/01/2021 रोजी सायं 4.00 वा विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली विविध विभागांची **आढावा बैठक** घेण्यात आली. सदर बैठकीत खालील प्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

- विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक
- जिल्हाधिकारी, नाशिक.
- पोलीस आयुक्त, नाशिक शहर.
- आयुक्त, महानगरपालिका नाशिक .
- पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण, नाशिक.
- उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, नाशिक.
- उपअधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नाशिक.
- सह आयुक्त, अन्न व औषधे प्रशासन, नशिक.
- सहाय्यक आयुक्त, अन्न व औषधे प्रशासन, नाशिक.
- प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक.
- उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक.
- उपनियंत्रक, वैधमापन शास्त्र, नाशिक.
- सहा.नियंत्रक, वैधमापन शास्त्र, नाशिक.
- जिल्हा सरकारी वकील, नाशिक
- निवासी उपजिल्हाधिकारी, नाशिक.

पर्यावरण विभाग
आयुक्त कार्यालय
नाशिक महानगरपालिका
दि. ०६/०१/२१
आयुक्त ६ / ०७/०१

---

| अ.क्र. | बैठकीतील मुद्दा | बैठकीत झालेला निर्णय |
|---|---|---|
| 1 | पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांनी दिनांक 23/09/2020 रोजी जिल्हाधिकारी, नाशिक यांना दिलेल्या अ.शा.पत्राच्या अनुषंगाने चर्चा. | याबाबत जिल्हाधिकारी नाशिक यांनी पोलीस आयुक्त, नाशिक यांना दिनांक 04/12/2020 व दिनांक 14/12/2020 रोजीच्या अर्धशासकिय पत्रान्वये कायदेशीर तरतुदी नमूद करुन स्पष्ट अभिप्राय यापुर्वीच कळविलेले आहेत, त्यानुसार पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांनी पुढील कार्यवाही करावी. |

महानगरपालिका, नाशिक
आवक क्र. ०८
.१/२०२१
पर्यावरण
उप/आयुक्त
नाशिक महानगरपालिका

पर्यावरण
१६
०८/०१/२०२१

| अ.क्र. | बैठकीतील मुद्दा | बैठकीत झालेला निर्णय |
|---|---|---|
| 2 | नाशिक जिल्हयातील रोलेट लॉटरी व ऑनलाईन जुगार परवान्याच्या अनुषंगाने चर्चा व प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने चर्चा | रोलेट लॉटरी व ऑनलाईन जुगार या बाबी बेकायदेशीर असून यावर यापुर्वी राज्यातील अनेक जिल्हयांमध्ये तसेच नाशिक शहरामध्ये देखील पोलीसांनीच कारवाई केलेली आहे व याबाबत कारवाई करणेसंदर्भात फौजदारी कायद्यानुसार पोलीसांना अधिकार आहेत अशी बाब जिल्हा सरकारी वकील ॲड.अजय मिसर यांनी स्पष्ट केली. याबाबतच्या कायदेशीर बाबींवर ऊहापोह करण्यात आला व तद्नंतर याबाबत पोलीस विभागानेच कारवाई करण्याचे ठरले. |
| 3 | कायदा व सुव्यवस्था संदर्भात<br>1. तडीपार प्रकरणांवर चर्चा<br>2. CRPC अंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाईशी संबंधित कलम 107, 109, 110 बाबत चर्चा<br>3. पॅरोल रजेसंदर्भात चर्चा<br>4. शस्त्र परवाना निर्गमित करणे व अपीलबाबत चर्चा.<br>5. पोलीस स्टेशन तपासणीबाबत कार्यक्रम निश्चित करणे. | या मुद्यामध्ये नमूद प्रकरणे जलद गतीने संबंधित विभागांनी निकाली काढावीत, असे ठरविण्यात आले. तसेच पोलीस स्टेशन तपासणीबाबत कार्यक्रम निश्चित करणेकरीता सूचना देण्यात आल्या. |
| 4 | मामलेदार कोर्ट ॲक्ट 1906 मध्ये पारित आदेशाच्या अनुषंगाने अंमलबजावणी संदर्भात येत असलेल्या अडचणी | मामलेदार कोर्ट ॲक्ट 1906 मध्ये तहसिलदार यांनी पारित केलेल्या आदेशाची प्रत प्राप्त झाल्यानंतर पोलीस विभागाने तात्काळ पोलीस बंदोबस्त गरजेप्रमाणे उपलब्ध करुन द्यावा, असे ठरविण्यात आले. |
| 5 | 1. गोदावरी प्रदूषण व रामकुंड परिसर साफसफाई साठी पोलीस बंदोबस्त देणेबाबत चर्चा.<br>2. शासकिय कार्यालय, रस्ते येथील पोस्टर्स काढणे व अवैध बांधकाम काढणेबाबत चर्चा. | नाशिक महानगरपालिकेच्या मागणीनुसार आवश्यक तेथे पोलीस बंदोबस्त प्रस्तुत कामांसाठी पोलीस विभागाने उपलब्ध करुन देण्याचे ठरविण्यात आले. |
| 6 | 1. अवैध मद्य विक्री व परवान्यांबाबत चर्चा<br>2. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, 1949 अंतर्गत कलम 93 अन्वये प्रतिबंधात्मक कारवाईबाबत चर्चा | अवैध मद्य विक्री तसेच महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, 1949 मधील प्रतिबंधात्मक कारवाईच्या संदर्भात राज्य उत्पादन शुल्क विभाग अग्रक्रमाने कारवाई करीत असून ती यापुढेही तशीच प्रभावीपणे चालू ठेवणेबाबत निर्देश देण्यात आलेत तसेच यासंदर्भात महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, 1949 मधील तरतुदींचे उल्लंघन पोलीस विभागाचे निदर्शनास आल्यास त्यांनीदेखील स्वयंस्फुर्तीने कारवाई करावी. असेदेखील ठरविण्यात आले. |

| अ.क्र. | बैठकीतील मुद्दा | बैठकीत झालेला निर्णय |
|---|---|---|
| | 1. विविध विभागांच्या गाडयांच्या निर्लेखीकरण बाबत चर्चा.<br>2. वाहन परवाने व अवैध वाहतुक बाबत चर्चा | प्रादेशिक परिवहन विभाग हा मुख्यत्वेकरुन वाहनांची नोंदणी, वाहतुक परवाने निर्गमित करणे इत्यादी बाबी करीत असल्याने क्षेत्रीय स्तरावर वाहतुक नियंत्रण तसेच परवाना तपासणी वगैरेच्या कामांसाठी प्रादेशिक परिवहन विभागाकडे असलेली साधनसामुग्री व मनुष्यबळाची मर्यादा विचारात घेता याबाबत जनहितार्थ पोलीस विभागाने कारवाई करण्याची प्रचलित पध्दत कायम ठेवून प्रभावी कारवाई करावी, असे ठरविण्यात आले. तसेच विविध विभागांच्या गाडयांच्या निर्लेखीकरणबाबत प्रस्ताव सादर करणेबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच परिवहन व पोलीस विभागासाठी आवश्यकतेनुसार नवीन वाहने खरेदीसाठी जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव सादर करावा त्याची प्रत विभागीय आयुक्तांना देण्याबाबत निर्देश देण्यात आले. |
| | 1. विना परवाना अवैध दुकानांबाबत चर्चा<br>2. कोरोना रुग्णांना पुरविण्यात येणाऱ्या औषधांच्या वाजवी किमतीवरील नियंत्रणाबाबत. ऑक्सीजन सिलेंडर पुरविण्यासंदर्भात मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने चर्चा. | अन्न व औषध प्रशासन विभाग प्रस्तुत मुद्यांच्या अनुषंगाने कार्यवाही कारवाई करीत असून त्या विभागाने पोलीस विभागाच्या मदतीची मागणी केल्यास त्यांना तात्काळ पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देण्यात यावा. तसेच अन्न व औषध प्रशासन विभाग यांनी नोंदविलेल्या फिर्यादींची अग्रक्रमाने दखल घेण्यात यावी, असे ठरविण्यात आले. याशिवाय प्रस्तुत मुद्याच्या अनुषंगाने गंभीर बाबी पोलीस विभागाच्या निदर्शनास आल्यास त्याची स्वयंस्फुर्तीने दखल पोलीस विभागामार्फत घेण्यात यावी, असे ठरविण्यात आले. |
| | साथरोग अधिनियम व आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत निर्गमित केलेल्या अधिसूचना / आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत. | साथरोग अधिनियम व आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत शासन स्तरावरुन वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना / आदेशांनुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून साथरोग अधिनियम व आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत आदेश निर्गमित केले जातात. सदर आदेशांचे उल्लंघन केल्याचे दिसून आल्यास त्यावर पोलीस विभागामार्फत भा.दं.वि. कलम 188 अंतर्गत थेट कारवाई करणे आवश्यक असल्याची बाब ॲड.अजय मिसर (जिल्हा सरकारी वकील, नाशिक) यांनी निदर्शनास आणुन दिली, तसेच याप्रमाणेच अन्य जिल्ह्यांमध्ये कारवाई होत असल्याची उदाहरणेदेखील बैठकीत नमूद केली. त्याप्रमाणे उक्त नमूद कायद्यांतर्गत लागू करण्यात आलेल्या निर्बंधांचे पालन क्षेत्रीय स्तरावर होत असल्याची खात्री पोलीस विभागाने करावी व निर्बंधांचे उल्लंघन झाल्याचे दिसून आल्यास अशा प्रकरणी पोलीस विभागाने योग्य ती कारवाई करावी, त्यासाठी कोणाकडूनही वेगळ्या तक्रारींची आवश्यकता राहणार नाही, असे ठरविण्यात आले. |

वर नमुद केल्याप्रमाणे त्या-त्या विभागाने नेमून दिल्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कारवाईचा मासिक अहवाल तयार ठेवावा. याबाबत वेळोवेळी आढावा बैठकांचे आयोजन करण्यात येईल. यानंतर बैठक समाप्त करण्यात आली.

6.1.2021

( डॉ.प्रविणकुमार देवरे )
**उप आयुक्त, (सा.प्र.)**
**विभागीय आयुक्त कार्यालय,**
**नाशिक विभाग, नाशिक**

स्थळ प्रतिवर मा.विभागीय आयुक्त यांची स्वाक्षरी असे.

प्रत - ---------------------------------------------------, माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.